ISSN - 2279 - 0489

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

Volume - IX Issue - II February - July - 2021

ENGLISH / MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed and UGC Listed
Journal No. 47100

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.631
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"GENIUS"**.

Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877, 7030308239 Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

**GENIUS - ISSN 2279 - 0489 - Impact Factor - 6.631 (www.sjifactor.com)**

# EDITORIAL BOARD

**Dr. S. Umesha**
Dept. Of Studies in Biotechnology, University of Mysore, Manasagangotri, Mysore, India.

**Dr. Tharanikkarasu K.**
Dept. Of Chemistry, Pondicherry University (Central University), Kalapet, Puducherry, India.

**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka, Dhaka 1000, Bangladesh.

**Dr. Altaf Husain Pandit**
Dept. of Chemistry University of Kashmir, Kashmir, India.

**Prof. Avinashi Kapoor**
Head, Dept. Of Electronic Science, Dean, Faculty of Interdisciplinary Sciences, Chairman, Board of Research Studies, South Campus, University of Delhi, New Delhi, India.

**Prof. P. N. Gajjar**
Head, Dept. Of Physics, University School of Sciences, Gujarat University, Ahmedabad, India.

**Dr. Uday P. Dongare**
Head, Dept. Of Physical Education, Shivaji Art's, Commerce & Science College, Kannad, Aurangabad, India.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast, Locked Bag 4, Maroochydore DC, Queensland, 4558 Australia.

**Dr. K. B. Laghane**
Dean. Faculty of Management Science.
Dean. Faculty of Commerce (Dr. B.A.M.U.)
Head Commerce Dept., Vivekanad College, Samarth Nager, Aurangabad, India.

**Brian Schiff**
Brussels, Copenhagen, Madrid, Paris.

**Dr. Prashant M. Dolia**
Dept. Of Computer Science & Applications, Bhavnagar University, India.

**Dr. Nicholas Ioannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor, Faculty of Computing, North Campus, London Metropolitan University, 166-220 Holloway Road, London, N7 8DB, UK.



PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# EDITORIAL BOARD

**Dr. Hanumanthappa J.**
Dept. Of Studies In Computer Science,
University of Mysore, Manasagangotri,
Mysore-570 006, Karnataka, India.

**Dr. Asharf Fetoh Eata**
College of Arts or Science Salmau Bin
Adbul Aziz University, KAS.

**Dr. Kailas Thombre**
Research Guide, Dept .of Economics
Deogiri College, Aurangabad, India.

**Dr. Isita Lahiri**
Dept. of Business Administration,
University of Kalyani, Kalyani West Bengal.

**Dr. Nirmala S. Padmavat**
Assit. Prof. English Dept. Nutan Mahavidyalaya,
Selu, Dist: Parbhani



**PUBLISHED BY**

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF ENGLISH PART - I


| S. No. | Title & Author | Page No. |
|---|---|---|
| 1 | Opportunities and Challenges of Digitization in India<br>**Prof. A.S. Purohit** | 1-5 |
| 2 | Cash to Cashless Indian Economy - Opportunities and Challanges<br>**Prof. Ashish Rameshlal Kanhu** | 6-13 |
| 3 | Challenges and Opportunities of Digital India<br>**Bhagyashree Sanjay Bhave** | 14-18 |
| 4 | Challenges and Opportunity of Demonetisation<br>**Prof. Dr. Vikas T. Ninghot** | 19-23 |
| 5 | An Overview of Impact & Importance of Cashless Economy in India<br>**Mr. Ingle Sangapal Prakash** | 24-28 |
| 6 | Digital Wallet: A Smart Gateway for Financial Transactions<br>**Asst. Prof. Sadhana S. Thatte** | 29-34 |
| 7 | Social and Economic Implications of Digitization<br>**Chavan Shivaji Haribhau** | 35-42 |
| 8 | Cashless Economy - Benefits and Challenge's<br>**Prof. Vijay KundalikWakode** | 43-45 |
| 9 | Woman Entrepreneurship Problems and Prospects<br>**Mr. Dnyaneshwar Uttamrao Pawde**<br>**Dr. Sanjaykumar Janardhanrao Jadhav** | 46-51 |
| 10 | Advantages of Digitization<br>**Dr. Rajesh M. Deshmukh** | 52-54 |
| 11 | Cash to Cashless Economy: Opportunities and Challenges for Chiplun City<br>**Shilpa Suhas Ranade** | 55-60 |
| 12 | Opportunities and Challenges of Digitization<br>**Shaikh Mohamad Sajed** | 61-65 |
| 13 | Analysis Study of the Online Marketing<br>**Mr. B. S.Bamne** | 66-69 |
| 14 | Digital India: Opportunities and Challenges<br>**Prof. Gajanan Yashwant Wankhade** | 70-73 |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मका पिकाची किमान आधारभूत किंमत आणि बाजार भावाचे विश्लेषण<br>**डॉ. सुनिल अण्णा गोरडे** | १-६ |
| २ | चंद्रपूर जिल्ह्या अंतर्गत भंद्रावती तालुक्यातील सेंद्रिय व जीवाणू खतांचा वापर व लोकप्रीयतेत वाढीचे विश्लेषणात्मक अध्ययन<br>**प्रा. डॉ. उत्तम चि. घोसरे** | ७-१० |
| ३ | माझी नाट्य सर्जनाची प्रक्रिया<br>**सतीश पावडे** | ११-१७ |
| ४ | राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NDA) सरकारच्या काळातील परराष्ट्र धोरण : एक दृष्टीक्षेप<br>**डॉ. संजय गव्हाणे** | १८-२० |
| ५ | कोरोना लॉकडाऊन कालखंडातील नोकरदार महिलांची कौटुंबिक भूमिका एक सामाजिक अध्ययन<br>**डॉ. जयश्री महाजन**<br>**समाधान कुंभार** | २१-२६ |
| ६ | 'एक कंठ विषपायी' काव्य नाटक में युगबोध<br>**प्रा. बापुसाहेब बाबासाहेब थोरात** | २७-३३ |
| ७ | महाराष्ट्राच्या राजकारणातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा उदय, वाटचाल आणि सद्यस्थिती<br>**प्रा. डॉ. शेंडे डी. डी.** | ३४-३७ |
| ८ | पौराणिक काल की शिक्षानीति की वर्तमान शिक्षानीति से साधर्म<br>**डॉ. अनुप सहदेव दळवी** | ३८-४१ |
| ९ | भारतातील आरोग्य व्यवस्था आणि मानवी अधिकार<br>**प्रा. डॉ. राजेंद्र एम. झाडे** | ४२-४४ |
| १० | दलित कवितेतील प्रतिमा<br>**मीरा नारायणराव गायके** | ४५-४८ |
| ११ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्रियांची उन्नती<br>**विष्णू तारगे** | ४९-५१ |

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | शारीरिक शिक्षणातील विविध कसोट्यांचा एक चिकित्सक अभ्यास<br>**अजय दादू जगताप**<br>**डॉ. एस. जी. चंद्रशेखर** | ५२-५६ |
| १३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची राजकीय सुधारणेमधील भूमिका<br>**बाबासाहेब गणपतराव देशमुख** | ५७-६१ |
| १४ | भारतातील कृषी क्षेत्राच्या विकासासाठी समूह शेतीची आवश्यकता<br>**शिवकुमार सुनिल मोरे** | ६२-६६ |
| १५ | भिवापूर तालुक्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचे विश्लेषणात्मक अध्ययन<br>**डॉ. सतीश भा. भोरकर**<br>**डॉ. रिता रा. राऊत** | ६७-७० |
| १६ | शालेय कार्याच्या व्यवस्थापनाची विभागणी<br>**मंगेशकुमार बबनराव अंबिलवादे** | ७१-७५ |
| १७ | महिलांचे सक्षमीकरण व कायदे<br>**प्रा. डॉ. किर्ती सदार**<br>**प्रभावती चं. चव्हाण** | ७६-८० |
| १८ | मीना सुधाकर प्रभू यांच्या सन २००८ ते २०१९ या कालखंडातील प्रकाशित साहित्य<br>**नागनाथ जायभाये** | ८१-८४ |
| १९ | कोरोना महामारीमध्ये शेतकऱ्याच्या सामाजिक व आर्थिक जीवनाचा अभ्यास<br>**विठ्ठल हरीभाऊ नागरे** | ८५-८९ |
| २० | औरंगाबाद जिल्ह्यातील खुलताबाद तालक्यातील मराठी माध्यमाच्या  खाजगी प्रशासनाव्दारे संचलित अनुदानित माध्यमिक शाळेतील मराठी व संस्कृत या विषयाचा अभ्यासक्रम, अध्यापक व अध्ययनार्थी यांच्या वरील जैन तत्वज्ञानाच्या योगदानाचा अभ्यास<br>**सुकुमार श्रेणिक नवले**<br>**प्रा. डॉ. उज्वला पी. भंडगे** | ९०-९७ |

# CONTENTS OF MARATHI PART - I



| **अ.क्र.** | **लेख आणि लेखकाचे नाव** | **पृष्ठ क्र.** |
|---|---|---|
| २१ | आश्रमशाळांमधील बंजारा समाजातील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक स्थितीचा अभ्यास :<br>विशेष संदर्भ : परभणी व हिंगोली जिल्हा<br>**डॉ. सुनिता आत्मारामजी टेंगशे**<br>**प्रा. विलास सोमा पवार** | ९८-१०२ |

# २१. आश्रमशाळांमधील बंजारा समाजातील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक स्थितीचा अभ्यास : विशेष संदर्भ : परभणी व हिंगोली जिल्हा

**डॉ. सुनिता आत्मारामजी टेंगशे**
विभाग प्रमुख तथा संशोधक मार्गदर्शक समाजशास्त्र विभाग, कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी.
**प्रा. विलास सोमा पवार**
समाजशास्त्र विभाग, आदर्श महाविद्यालय हिंगोली जि. हिंगोली.

**प्रस्तावना**

**संपूर्ण भारतात बारा कोटी पेक्षा अधिक आणि महाराष्ट्रात दीड कोटीच्या वर लोकसंख्या असलेला बंजारा समाज हा आजही सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक दृष्ट्या अत्यंत मागासलेला आहे. प्रामुख्याने ऊसतोडणी सारखे फिरते व्यवसाय आणि मोल मजुरीची कामे बंजारा समाजातील लोक करताना आढळून येतात. संपूर्ण भारतात या समाजाची बोलीभाषा, वेशभूषा चालीरीती, राहणीमान एकसमान असून बंजारा समाज हा विखुरलेला आहे. त्यामुळे या समाजात सर्वांगीण विकास झालेला आढळून येत नाही. यासोबतच परभणी व हिंगोली जिल्ह्यातील बंजारा समाज हा शैक्षणिक आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात मागासलेला समाज म्हणून ओळखला जातो. साखर कारखान्यांमध्ये ऊसतोडणी कामगार म्हणून हा समाज मोठ्या प्रमाणावर कष्टाची कामे करताना दिसून येतो. ऊसतोडणी सारख्या फिरत्या कष्टाच्या रोजगारीमुळे या समाजात अनेक सामाजिक समस्या निर्माण झालेल्या आहेत. संपूर्ण भारताच्या अत्यंत प्रारंभिक समाजापैकी एक असलेला बंजारा समाज हा आधुनिक काळातही भटक्या अवस्थेत सामाजिक जीवन जगत आहे. भटके जीवन जगत असतानाही हा समाज मात्र आपले अस्तित्व शहरी समाजापासून आजही आलिप्त राखून आपल्या बंजारा संस्कृतीची जोपासना करीत आलेला आहे. महाराष्ट्रातील बंजारा समाज मुख्यतः मराठवाडा आणि विदर्भ भागांमध्ये मोठ्या संख्येने वास्तव्याला आहे. परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातही बंजारा समाजाची संख्या अधिक आहे. अंधश्रद्धा, अज्ञान,निरक्षरता, दारिद्र्य, शैक्षणिक असुविधा अशा अनेक प्रमुख समस्या बंजारा समाजात आढळून येतात. प्राचीन लक्षणे,अलिप्तता,समाजातील स्थान, आर्थिक आणि शैक्षणिक मागासलेपणा, भय व न्यूनगंड इत्यादी बाबींचा विपरीत परिणाम बंजारा समाजाच्या सर्वांगीण विकासावर होताना दिसत आहे. बंजारा समाजातील कुटुंब हे मोठ्या प्रमाणावर मजुरी आणि ऊसतोडणी सारखे फिरते काम करत असल्यामुळे त्यांची आर्थिक उन्नती होताना दिसत नाही. अशा फिरत्या रोजंदारीच्या कामामुळे त्यांच्या पाल्यांचे मात्र शैक्षणिक नुकसान मोठ्या प्रमाणावर झालेले आहे असे या सर्व बाबी वरून दिसून येते.**

**आश्रमशाळांमधील बंजारा समाजातील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक स्थितीचे अभ्यास**

**१) निवास किंवा राहते घर प्रकार**

बंजारा समाज हा मुळात कुडाच्या घरात, मातीच्या व कौलारूच्या घरात वास्तव्य करत आलेला समाज असून तांड्यातील पक्के घरे नसलेल्या लोकांना तांडा वस्ती सुधार योजना, प्रधानमंत्री आवास योजना या माध्यमातून तांड्यातील बंजारा समाजामधील लोकांना सर्व सुविधांसह पक्की घरे बांधून दिली जात आहेत. त्यामुळे काही प्रमाणात परभणी व हिंगोली जिल्हयातील बंजारा समाजातील तांडा-वस्तीमधील लोकांच्या मूळ राहते घरात बदल होताना दिसत आहे. परंतु हा झालेला बदल सरसकट झालेला नसून आजही अनेक कुटुंब कुडाच्या, कच्च्या मातीच्या घरात वास्तव्याला आहे. जेथे कोणतीही सोयी- सुविधा पाहावयास मिळत नाही, आश्रमशाळांमधील बंजारा समाजातील निवासी विद्यार्थ्यांच्या कुटुंब त्यांचे मूळ राहते घर ६३.३३ टक्के कुडाचे व कच्च्या मातीचे आहेत तर केवळ १८.५७ टक्के सिमेंटची पक्की घरे आहेत. यावरून या समाजातील विद्यार्थ्यांच्या राहत्या घरात सुधारणा झालेली दिसून येत नाही यासाठी बंजारा समाजातील अज्ञान, गरीबी, दारिद्र्य इत्यादी कारणे कारणीभूत असल्याचे दिसून येतात.

**२) निवासाचे ठिकाण प्रकार**

बंजारा समाज हा मुळात अतिदुर्गम व डोंगराळ भागांमध्ये वास्तव्य करणारा समाज म्हणून ओळखला जातो. आपले भटकंती जीवन संपल्यानंतर जेव्हा कोणताही समाज एखाद्या ठिकाणावर स्थिर होतो त्या ठिकाणालाच लोकवस्ती असे संबोधण्यात येते. बंजारा समाज हा संपूर्ण भारतामध्ये विखुरलेला आहे त्यांची मूळ संस्कृती इतर समाजापासून आगळ्या-वेगळ्या स्वरूपाची आहे त्यांची कौटुंबिक जीवन शैलीही याला अपवाद नाही तेव्हा त्यांचे निवासाचे ठिकाण सर्वाधिक प्रमाणात ८६ टक्के विद्यार्थ्यांचे कुटुंब आहे. तांडा वस्ती वाडी या ठिकाणावर राहतात तर नगरपालिका, नगरपंचायत या ठिकाणी राहणाऱ्या कुटुंबाची संख्या अत्यंत अल्प आहे. अनेक तांडा वाडी वस्ती पर्यंत जाण्यासाठी पक्के रस्ते नाही कोणतेही दळणवळणाची साधने नाही काही ठिकाणी ग्रुप ग्रामपंचायत असल्यामुळे तांडयामध्ये कोणत्याही सोयी- सुविधा आणि सर्वांगीण विकास झालेला दिसून येत नाही म्हणून या समाजातील समस्या इतर समाजाच्या तुलनेत वेगळा असल्याचे आपल्याला दिसून येते.

**३) कुटुंबातील सदस्य संख्या**

आश्रमशाळांमधील वसतीगृह निवासी असलेल्या बंजारा समाजातील बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या कुटुंबातील सदस्य संख्या ही जास्त आहे ५ ते ८ सदस्य संख्या सणाऱ्या बंजारा समाजातील विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची संख्या ६२.२४ टक्के इतकी आहे.अनेक कुटुंबांमध्ये ९ ते १२ सदस्य संख्या आहे.आणि १३ व त्यापेक्षा अधिक कुटुंबाची संख्या ही या समाजामध्ये आढळून येते.यावरून असे स्पष्ट होते की सर्वात आधीक सदस्य संख्या असणाऱ्या कुटुंबांमध्ये ५ ते ८ सदस्य राहतात तर ९ ते १२ सदस्य संख्या असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाणही जास्त आहे. त्यामुळे बंजारा समाजातील आश्रमशाळेत शिक्षण घेणाऱ्या

विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचा आकार सदस्य संख्येनुसार मोठा आहे.त्यामुळे आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत कमी पडत असल्याचे जाणवत आहे.त्यातून त्यांची आवश्यक गरज पूर्ण होताना दिसून येत नाही म्हणून मोठे असणाऱ्या कुटुंबाला वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

४) आश्रमशाळांमधील बंजारा समाजातील विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे प्रकार

बंजारा समाजातील कुटुंबांमध्ये राहणाऱ्या सदस्यांची संख्या जास्त असल्यामुळे या समाजात अधिकांश प्रमाणात संयुक्त आणि विस्तारित असलेले मोठे कुटुंब पाहावयास मिळतात. अशा प्रकारच्या कुटुंबात दोन किंवा अधिक पिढ्यांचे सदस्य राहत असल्यामुळे सदस्य संख्या जास्त असणे स्वभाविकच आहे. मोठ्या कुटुंबाचा आर्थिक भारही जास्त असल्यामुळे या समाजातील कुटुंबाची आर्थिक स्थितीही बेताचीच असल्याचे दिसून येते. या समाजात सर्वाधिक प्रमाणात संयुक्त कुटुंब आढळून येते तर विभक्त कुटुंबाचे प्रमाण आजच्या आधुनिक समाजानुसार बंजारा समाजात ही वाढू लागलेले आहेत. या समाजातील प्रत्येक कुटुंबात एक किंवा दोन सदस्यांचे विवाहही झालेले आहेत त्यामुळे सदस्य संख्येत भर पडत जाऊन अशा कुटुंबाचे आकार मोठे झालेले आहे. संयुक्त कुटुंब पद्धती या समाजामध्ये अस्तित्वात असल्यामुळे सामाजिक, आर्थिक, धार्मिक इत्यादी सर्वच क्षेत्रात कुटुंबातील सर्व सदस्यांना समान स्वरूपाचे अधिकार, हक्क प्राप्त होतात परंतु कुटुंबातील सदस्य संख्या अधिक असल्यामुळे सर्वांना समान संधी मिळेल याची शाश्वती नाही आणि सर्वांच्या गरजाही पूर्ण होतीलच असेही सांगता येत नाही म्हणून अशा संयुक्त कुटुंबातील सदस्यांच्या समस्या, अडचणी वेगवेगळ्या स्वरूपाच्या आहेत.

५) कुटुंबाची अधिसत्ता व वंशपरंपरा

मराठवाड्यातील विशेषतः परभणी आणि हिंगोली जिल्ह्यामधील बंजारा समाज हा रूढी, प्रथा-परंपरा मानणारा समाज आहे. या समाजात संयुक्त कुटुंबाचे प्रचलन अधिक असल्यामुळे कुटूंबाची अधिसत्ता आणि वंशपरंपरा ही अधिक प्रमाणात पितृसत्ताक असल्याचे दिसून येते. कुटुंबातील कर्त्या पुरुषांच्या हातात कुटुंबाची सर्व सत्ता असल्यामुळे तो या कुटुंबाचा प्रमुख असतो तेव्हा आश्रमशाळांमधील बंजारा समाजातील विद्यार्थ्यांच्या बहुसंख्य कुटुंबाची अधिसत्ता आणि वंशपरंपरा ही पितृसत्ताक स्वरूपाची आहे म्हणजेच या समाजात पितृसत्ताक कुटुंब पद्धतीचा अवलंब केला जातो. वंशपरंपराही त्याच्या नावानेच चालते. विवाहानंतर मुली आपल्या पतीच्या घरी राहावयास जातात. मातृसत्ताक कुटुंब पद्धतीचा अवलंब या समाजात केला जात नाही त्यामुळे या समाजामध्ये स्त्रियांना दुय्यम दर्जा व स्थान असल्याचे दिसून येते.

६) घरातील वापरल्या जाणाऱ्या साधने प्रकार

बंजारा समाज हा प्रथा-परंपरा जपणारा समाज आहे त्यांची संस्कृती ही पारंपारिक स्वरूपाची असून हा समाज आपली संस्कृती जीवापाड जपत आलेला आहे. आजच्या आधुनिक काळाबरोबर बंजारा समाजातही काही बदल घडून येत आहेत. घरात वापरल्या जाणाऱ्या मनोरंजन आणि वाहन साधनातही

बदल झालेला दिसून येतो. तेव्हा आश्रमशाळांमधील बंजारा समाजातील विद्यार्थ्यांच्या कुटुंबामध्ये जी साधने वापरली जातात ती साधने बहुसंख्य प्रमाणात सर्वच बंजारा समाजातील कुटुंबामध्ये कमी-अधिक प्रमाणात दिसुन येतात. यामध्ये प्रामुख्याने सर्वात जास्त वापरले जाणारे साधन म्हणून जळतनावरील चूल आहे. त्यानंतर दूरदर्शन पंखा मोबाईल सायकल इत्यादी आहेत तर यानंतर कमी-अधिक प्रमाणात गॅस शेगडी स्टोह फ्रिज गादी-पलंग इत्यादी साधने वापरली जातात तर चार चाकी वाहन वापरणाऱ्यांची संख्या या समाजामध्ये नाहीतच जमा आहे.काही कुटुंबांमध्ये उदरनिर्वाहाचे साधन म्हणून चार चाकी टेम्पो जीप गाडी घेऊन आपले कौटुंबिक चरितार्थ चालविताना आढळून येतात असे असले तरी या समाजामध्ये आढळून येणारी साधने उपकरणे अत्यंत साध्या स्वरूपाची आहेत परिणामी इतर समाजाच्या तुलनेत या समाजातील कुटुंबात अपुरी साधने असण्याचे प्रमुख कारण म्हणजे या समाजातील दारिद्र्य आणि गरिबी असल्याचे दिसून येते.

**७) शौचालय व्यवस्था प्रकार**

भारतीय समाजातील सर्वांना `स्वच्छ भारत अभियान 'या योजनेच्या माध्यमातून शौचालय व्यवस्थेच्या वापराबाबत शासनाद्वारे सर्वत्र जनजागृती मोहीम राबविली जात आहे. सरकारी योजनेतून गोरगरीब असणाऱ्या कुटुंबांना शौचालय बांधण्यासाठी अनुदान रक्कम दिली जात आहे. परंतु याचा फारसा परिणाम होताना मात्र तांडा व खेड्यापाड्यांमध्ये दिसून येत नाही. आश्रमशाळांमधील बंजारा समाजातील निवासी असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबातील शौचालय व्यवस्थेबाबत माहिती घेतली असता असे दिसून येते की बहुसंख्य बंजारा समाजातील कुटुंबामध्ये शौचालय व्यवस्था प्रकार नाही स्वतःच्या मालकीचे सौचालय बांधलेले नाहीत. बहुसंख्य कुटुंबामध्ये शौचालयाची व्यवस्था नसल्यामुळे सार्वजनिक शौचालयांचा वापर करताना दिसतात. तेही नसेल तर सार्वजनिक ठिकाणी शौचालयाचा वापर करणारे मोठ्या प्रमाणात आढळून येतात. म्हणजेच आश्रमशाळांमधून शिक्षण घेणाऱ्या बंजारा समाजातील बहुतांश निवासी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाकडे स्वतःच्या मालकीचे सौचालयाची व्यवस्था नसल्यामुळे ते इतरत्र जाऊन आपली गरज भागवित असतात या समाजातील कुटुंबात सौचालय नसण्याचे प्रमुख कारण म्हणजे गरीबी आणि दारिद्र्य हे आहे यामुळे या समाजातील लोक शौचालय बांधत नाहीत म्हणून शौचालयाची समस्या या समाजामध्ये गंभीर असल्याचे दिसून येते.

**सारांश**

परभणी आणि हिंगोली जिल्हयातील आश्रमशाळांमधील बंजारा समाजातील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक स्थितीच्या अध्ययनावरून असे दिसून येते की या समाजातील विद्यार्थ्यांचे मूळ राहते घर हे तांडा वाडी वस्ती मध्ये आहे निवासाचे ठिकाण बहुसंख्य प्रमाणात ग्रामपंचायत व ग्रुप ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये आहे या समाजातील कुटुंबांची संख्या सर्वात जास्त असल्यामुळे येथे संयुक्त कुटुंब पद्धती मोठ्या प्रमाणात आढळून येत असली तरी या कुटुंबांमध्ये पितृसत्ताक कुटुंब पद्धतीचा अधिक मोठ्या प्रमाणावर प्रचलन आहे.

**कुटूंबाची आधिसत्ता व वंशपरंपराही त्याच्या नावाने चालते.मुलींचे विवाह झाल्यानंतर त्या आपल्या पतीच्या घरी राहावयास जातात. या समाजामध्ये घरात वापरल्या जाणाऱ्या साधने प्रकार हे अगदी साधे असून त्यात सर्वात अधिक जळतानावरील चूल, पंखा, दूरदर्शन, मोबाईल, सायकल इत्यादि साधने मोठ्या प्रमाणात आढळून येतात या समाजातील कुटुंबाकडे स्वतःच्या मालकीचे सौचालय व्यवस्था पाहावयास मिळत नाही म्हणून सौचालयाची समस्या या समाजा मध्ये अधिक आहे.**

**संदर्भ**


१. **खंदारे अनिल - भारतीय सामाजिक परिवेश में बंजारा समाज, क्रिश पब्लिकेशन, उज्जैन.**

२. **संपादक - प्रदीप गायकवाड - मागासवर्गीयांच्या विकास योजना, समता प्रकाशन, नागपूर.**

३. **गुप्ता एम एल/ शर्मा डीडी - भारत मे समाज: संरचना एवं परिवर्तन, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा.**

४. **अभया शेलकर- आश्रमशाळा संहिता, नाशिक लॉ हाऊस, औरंगाबाद.**

५. **गंदेवार एस एन- भारतीय समाज: वादातीत विषय आणि समस्या, विद्याभारती प्रकाशन, लातूर.**

६. **काचोळे दा धों - भारतीय समाजरचना आणि लोकसंख्या समाज, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.**